# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१७/०६/२०१६.

**१) क्षुल्लक कारणावरून कु—हाडीने मारून जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. :—**

दिनांक १५/०६/२०१६ रोजी २४.०० वा. दरम्यान फिर्यादीचा पती ज्ञानेश्वर शंकर कोडवते, वय ३२ वर्ष रा. परसोडी याने त्याच्या पत्नीस '' जेवनाचा डब्बा का आनला नाही '' असे बोलुन शिविगाळ करीत होता. त्यावेळी फिर्यादी महीलेचा पती अंगणात झोपला असतांना यातील आरोपी हा त्या ठिकाणी येवुन '' शिविगाळ कोणाला करतोस '' असे बोलुन भांडण करून स्वत:च्या घरून आनलेल्या कु—हाडीने फिर्यादीच्या पतीच्या डोक्यावर मारून जखमी करून जिवाने मारण्याचा प्रयत्न केला. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखणी येथे कलम ४४७,३०७ भादंवि सहकलम ३,(१)(२) अ.जा.ज.अ.प्र.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, साकोली श्री. संखे सा. हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली.

**२) घरकुलाचे बांधकाम थांबल्याच्या कारणावरून पती—पत्नीस शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक १५/०६/०१६ रोजी २१.०० वा. दरम्यान आरोपीतांनी गैर कायदयाची मंळडी जमवुन फिर्यादी महीलेच्या घरातील खोलीत जावुन फिर्यादीच्या पतीचा हात धरून यातील ४ आरोपी पैकी आरोपी क्र. १ याने '' तु माझी ग्रा.पं. मध्ये खोटी तक्रार केली, त्यामुळे माझे घरकुलाचे बांधकाम थांबले. '' या कारणावरून फिर्यादी महीला व तीच्या पतीला ढकलढुकल करून फिर्यादी महीलेचा विनयभंग करून फिर्यादी महीला व तीच्या पतीला आरोपीतांनी शिवीगाळ, भांडण करून जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादी महीलेचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १४३,४५२,३५४(ब),३२३,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पो.नि. गिते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) एचपी. कंपनीच्या लॅपटॉपची चोरी:—**

दिनांक १५+१६/०६/०१६ रोजी रात्र दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादी गिरधारी ईस्तारी मोटघरे, वय ४३ वर्ष रा. तिलक वार्ड मोहाडी याच्या ऑफिसची बंद खिडकी उघडून आत प्रवेश करून त्यात ठेवलेला १ एचपी. कंपनीचा लॅपटाप तसेच लीनीओ कंपनीचा शासनाकडून मिळालेला एक लॅपटॉप असा एकुन २५,०००/—रु. चा माल चोरून नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. गि—हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–

दिनांक १६/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. आंधळगाव, पवनी व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०१ लिटर २६० मि.ली. देशी दारू कि. ३५०/–रू. तसेच जुगारातुन ५२०/–रू. असा एकुण कि. ८७०/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

17/6/16

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.